# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२१ वा ❑ रविवार दि.२२ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विमानातील ब्लॅक बॉक्स काय असते?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघाताच्या घटनेने लोकांना धक्का बसला आहे. विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही सेकंदातच बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर एका निवासी भागात कोसळले आणि काही क्षणातच आगीमुळे सर्व काही नष्ट झाले. या अपघातात किती जीवित आणि वित्तहानी झाली हे अद्याप समजलेले नाही, परंतु विमानात २४२ लोक होते जे लंडनला जाणार होते. आता ब्लॅक बॉक्स सापडल्यानंतरच अपघाताचे कारण कळू शकेल.

खरंतर, ज्याप्रमाणे रस्त्यांवर अपघात होतात, त्याचप्रमाणे हवाई मार्गांवरही अपघात होतात आणि त्यानंतर, सर्वात जास्त चर्चेत येणारी गोष्ट म्हणजे ब्लॅक बॉक्स. तुम्ही आपण ब्लॅक बॉक्सबद्दल बरेच ऐकले असाल, पण तुम्हाला त्याचे कार्य आणि आवश्यकता माहित आहेत का? विमानातील ब्लॅक बॉक्स हे एक असे उपकरण आहे ज्याबद्दल अनेकांना उत्सुकता असते.

ब्लॅक बॉक्स म्हणजे काय?

ब्लॅक बॉक्स हे एक मजबूत, उष्णता आणि दाब प्रतिरोधक उपकरण आहे, जे विमानात बसवले जाते. त्याचे काम उड्डाणादरम्यान घडणाऱ्या सर्व क्रियाकलापांची नोंद करणे आहे. ही एक विमानात बसवलेली एक प्रकारची डिजिटल डायरी आहे, ज्यामध्ये बरीच माहिती साठवली जाते आणि अपघातानंतर, जेव्हा ब्लॅक बॉक्स सापडतो तेव्हा अपघाताची अचूक माहिती मिळते.

ब्लॅक बॉक्स हे नाव ऐकल्यानंतर बऱ्याचदा लोकांना वाटते की तो काळ्या रंगाचा आहे, पण प्रत्यक्षात तो काळ्या रंगाचा नाही. तो चमकदार केशरी रंगाचा असतो जेणेकरून विमान अपघातानंतर तो सहज सापडेल. तो खूप मजबूत असल्याने आणि कोणत्याही प्रकारच्या अपघातातही त्याचे नुकसान होत नाही, म्हणून त्याला ब्लॅक बॉक्स म्हणतात.

ब्लॅक बॉक्समध्ये दोन महत्त्वाचे भाग असतात. त्यात एक फ्लाइट डेटा रेकॉर्डर असतो, जो उड्डाणादरम्यानची सर्व तांत्रिक माहिती, जसे की वेग, उंची, दिशा आणि इंधन पातळी, इत्यादी माहिती रेकॉर्ड करतो. त्यात कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर देखील असतो, जो पायलट आणि सह-पायलटमधील संभाषण रेकॉर्ड करतो.

ब्लॅक बॉक्स का आवश्यक आहे?

विमानाच्या सुरक्षिततेसाठी ब्लॅक बॉक्स खूप महत्त्वाचा आहे. त्याच्या मदतीने अपघाताची चौकशी करणे सोपे होते. ब्लॅक बॉक्समध्ये नोंदलेल्या माहितीच्या आधारे, तपासकर्त्यांना अपघात का झाला आणि भविष्यात असे अपघात कसे टाळता येतील हे शोधता येते.

खरंतर, ब्लॅक बॉक्समध्ये एक मेमरी चिप असते ज्यामध्ये सर्व डेटा साठवला जातो. हा डेटा सतत रेकॉर्ड केला जातो आणि ठराविक वेळेनंतर जुना डेटा नवीन डेटासह ओव्हरराईट केला जातो. ब्लॅक बॉक्स हे विमानाच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वाचे उपकरण आहे. ते अपघाताच्या तपासात खूप मदत करते आणि भविष्यातील अपघात रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

विमान अपघातानंतर त्याचा ब्लॅक बॉक्स शोधण्यावर भर दिला जातो आणि त्यामुळे अपघाताची अचूक माहिती मिळते असे तुम्ही अनेकदा ऐकता. खरंतर, अपघातानंतर ब्लॅक बॉक्स शोधणे हे एक कठीण काम असते. यासाठी विशेष उपकरणे वापरली जातात, जी पाण्याखाली किंवा जमिनीखाली देखील ब्लॅक बॉक्स शोधू शकतात.






# त्यांच्यासाठी वारी म्हणजे माहेरची भेट !

ज्योतिर्मय साहित्य

**सकळ तीर्थामध्ये पंढरी या क्षेत्रास सर्व संतांनी माहेर म्हणूनच संबोधले आहे. संत एकनाथ महाराज म्हणतात 'माझे माहेर पंढरी । आहे भिवरेच्या तिरी' प्रत्येक सासुरवाशिणीला जशी आपल्या माहेरची ओढ लागते. तसेच वारीमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विठ्ठलभक्तांला विठू माउलीचे वेध लागतात . ज्येष्ठ कृष्ण अष्टमी प्रस्थानाच्या आदल्या दिवशीपासूनच हजारो वैष्णवांची मांदियाळी आळंदी, देहू मध्ये दाटी करते. नकळत पाऊले पंढरीची वाट चालू लागतात .........**


**'पाउले चालती पंढरीची वाट। सुखी संसाराची सोडुनिया गाठ।**

**वारीतील सुखापुढे संसारातील सर्व सुखे फिकी आहेत. म्हणूनच 'या सुखाकारणे देव वेडावला।' असे वर्णन संतानी केले आहे.**



## वारीतला "ति"चा सहभाग

सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर.



वारकरी संप्रदायामुळेच समाजातील सर्व घटकांना ईश्वरभक्तीचा निखळ, अनमोल आनंद प्राप्त करून देणारी ही जागतिक पातळीवरील एक अपूर्व आणि ऐतिहासिक घटना मानली जाते. गिनीज बुकमध्ये नोंद झालेल्या वारीच्या परंपरेला आज जागतिक दर्जा लाभला आहे; कारण अशी अभिनव व सामुदायिक पारमार्थिक वाटचालीची घटना जगात कोठेही नाही. म्हणूनच अनेक दृष्टीने ही परंपरा महत्वपूर्ण ठरते.

वारीत सहभागी होणं हे सहभागी होणाऱ्या महीला मंडळींना खरंतर अवघड आहे. महीनाभर घरदार सोडून. आपल्या सांसरीक जबाबदाऱ्या , सामाजिक भान, नातीगोती, असे कितीतरी पदर त्याला आहे. प्रत्येक बाई पदर जे न ढळता, त्याचा समतोल राखण्यासाठी सतत कार्यरत असते. डोक्यावरचा पदर खाली न पडू देता ती ही जबाबदारी सराईतपणे पार पाडत असते. वयाच्या ठराविक टप्प्यात मात्र ती ह्या जबाबदाऱ्या पार पाडतच आपल्या दादल्यांच्या संगतीने, कुटुंबासोबत वारीत सहभागी होते.

दिंडीतल्या बहुतेक सगळ्या बायका एरवी घर, संसार, मुलं सांभाळणं, नवऱ्याच्या मर्जीनुसार वागणं, सासरच्यांचा मान राखणं आणि शेतातही राबणं, हेच त्यातल्या बहुतेकींचं जगणं.....

अशी अनेक वर्षे झाल्यानंतर त्या मनातल्या भावना व्यक्त करत म्हणतात ''डोईवरचे पदर किती फाटून गेले बघा डोक्यावर घेऊन घेऊन..... पण आता वारीत आल्यावर इकडे आस्सं करायले मिळते आता,'' डोईवरचा पदर दिमाखात मागे सारून कंबरेला खोचत महीला मंडळी मनापासून नाचतात, फेर धरतात, फुगड्या खेळतात, अभंग म्हणतात. समाजाने स्त्री म्हणून लादलेली ओझीच त्या जणू झुगारून देतात असे वाटते, वारीत सामील झाल्यावर अनेक बायकांचा उत्साह पाहून आजूबाजूला असलेल्या बाकीच्या बायकांपण आणखी धिट होतात. भजन, नामस्मरण करत, खळखळून हसतात आणि जमलेल्या पुरुषांच्या चेहऱ्यावरही हसू उमटवतात.

सगळं घरदार महिनाभरासाठी मागे ठेवून सीताबाई, सारजाबाई, लक्ष्मीबाई, उमाबाई, कुसुमबाई, अशा अनेक जणी, अनेक ठिकाणाहून वारीला येतात. जवळपास तीस, पस्तीस वर्षं संसार केल्यावरही नवरा कुठं पाठवायला तयार नसतोच. ठराविक वयानंतरही. पण ह्या वारीला येण्याचा हट्टच धरतात रामराव, शामराव, गोविंदराव, तुकाजी, सुखाजी पाटलांना होकार भरावाच लागतो. बायांना खूप आनंद होतो...... आणि त्या वारीची तयारीला लागतात. आणि ज्याला त्याला सांगू लागतात.......

''आता आम्ही थोडे दिवस रजेवर जाणार. इतके दिवस घरातूनच प्रत्येक गोष्टीला नकार असायचा. मनातले भाव दाबूनच ठेवलं होतं म्हणून सारखं दबूनच राहावे लागले. अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळणार हक्काचे व्यासपीठ म्हणजे वारी अशी प्रत्येकीची भावना असावी. म्हणूनच म्हणून सगळ्याजणी मोठ्यानं भजनं म्हणायची, भारुडं करायची, पंढरीला जायचं, विठूरायाची भेट घ्यायची, त्याला डोळा भरून बघायचं अन् साठवायचं पण.......... अशा विचारानेच वारीत सहभागी होत असतील.

अनेक जणींचं वारीचे हे बारावे, चौदावे, पंधरावे, विसावे तर कोणी पंचवीस, तीसावे वर्ष आहे. आता त्या वारी बदल भरभरून बोलतात. त्या म्हणतात दरवर्षी आळंदी ते पंढरपूर हा प्रवास म्हणजे स्वतःला पारखून घेणं. वर्षभर आम्ही बायका वाट बघत असतो या पंधरा-वीस दिवसांची. माऊली, तुकोबा सोबत एकत्र चालायला लई चांगलं वाटतं. पांडुरंगाच्या भेटीला निघालं की मागचा विचार नाही करायचा, संसाराचा ..... तो समंद मागचं सांभाळून घेईल, हि प्रत्येकीची भावना... आपण पुढेपुढे चालत राहायचं पंढरीकडे...... रोजच्या जगण्याचं बी असंच असतयं की. ''हेच वाक्य जिच्या तिच्या मुखी.

दिंडीसोबत त्या वारीला निघतात. वारीत सहभागी होणाऱ्या महीला बहुतेक महाराष्ट्राच्या सर्व भागांतून येतात. संत ज्ञानेश्वरांच्या, संत तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत येणाऱ्या वारकऱ्यांचे प्रमाण जास्त असते. आळंदीहून, देहूहुन, इतर ठिकाणाहून पंढरपूरला निघालेली ही सगळी मंडळी मजल दरमजल करत मुखी आपल्या लाडक्या विठू माऊलीचे नाव घेत अवघड असा सासवडच्या टप्पा न थकता चढतात. ह्या टप्प्यात बायकांचे विशेष कौतुक वाटतं.

मुक्कामाची जागा तंबूत, मिळेल ते खायचं, जागा जशी मिळेल तिथे झोपायचं, अंघोळ कशी करायची, कपडे धुवायला मिळतील का? आणि कुठे धुवायचे ? असे रोजच्याच गरजा असलेले प्रश्न... पण न कुरकुरता प्रश्न सोडवत लाडक्या विठुरायासाठी चालत राहतात. दिंडी थांबते , तेव्हा कुणी आवराआवर करतं, तर कुणी पोथीची तयारी करतं, तर कुणी संध्याकाळच्या स्वयंपाकाच्या तयारीत त्यातच ह्या पण समरसून जातात. एखादीचा गोड गळा तर एखादीचा आवाज एकदम खडा. पण ओव्या, भजन, अभंग म्हणत एकेक टप्पा पार करतात.

वारीत सहभागी होणाऱ्या स्त्रिया अनेकदा मुक्कामाच्या ठिकाणी ओव्या म्हणतात. जास्त करून विठ्ठलाविषयी असलेल्या लोकगीतांचे वैशिष्ट्य म्हणजे या गीतांमधील विठ्ठल रुक्मिणीला घरकामात मदत करणारा आहे. असा आपला पण साथीदार असावा हि त्या मागची भावना असावी. रुक्मिणी धुणे धुवायला चंद्रभागेवर जाते तेव्हा कपडे घासण्याचे, पिळण्याचे काम विठ्ठलाकडे असते.

।।चंद्रभागेच्या पात्रामध्ये सोनियाचा विळा,
रुक्मिणी धुणं धुते देव विठ्ठल देतो पिळा।।

(हे मला आमच्या मदतनीस सौ शैलाने सांगितले तिला खूप खूप ओव्या, भजन सुंदर आवाजात म्हणते.)

अनेक पुरुषांचा घरी ज्या कामांशी संबंध येत नाही अशी कामे ते वारीमध्ये करतात. स्वयंपाकामधे मदत करणे भाजी खरेदी, चिरणे, बनवणे, स्वयंपाक बनवणे अशी कामे पुरुषमंडळी करतात. पंगत वाढण्याची जवाबदारी मुख्यत्वे पुरुषांकडे असते. चपाती, भाकरी करण्याचे काम मात्र अजून बहुतेक ठिकाणी महिला वर्गाकडे आहे. कायमच मनाचा कोंडमारा करणाऱ्या बंधनांपासून आणि संसाराच्या धबडग्यातून सुटका म्हणूनही स्त्रिया वारीकडे पाहात असतील? त्यांच्यासाठी वारी म्हणजे माहेरची भेट! असाच असावे. मायबाप विठू माऊलीची भेट होणं हे आपल्या नशिबाने दिलेली साथ. अगदी ''लेकीला माहेरी गेल्यासारखं वाटतं ती कशी मोकळेपणाने वावरते तसं त्यांना वाटतं. कुणाचं बंधन नाही, अगदी सुखाच्या सरींवर चिंब भिजून जावं असं वाटतं. नात्यांच्या मोहातून मुक्त होत फक्त विठ्ठलाचा होणं......

।। भेटी लागे जीवा लागलीसे आस पाहे रात्रीं दिवस वाट
तुझी पाहतेस वाटुली पंढरीची ।। ।। रामकृष्ण हरी।।

# माझ्या मातीतील लोकांनी केलेला सन्मान माझ्यासाठी जास्त महत्वपूर्ण - डॉ.चंदनशिवे

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**– आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही शिक्षक आणि विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी नाटक आणि लोककलांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य कलावंत आणि नाटककार सातत्याने करत आले आहेत, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख आणि सुप्रसिद्ध सिने-पार्श्वगायक, लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे यांनी आज केले.

मराठवाड्याचे भूमिपुत्र तथा मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख आणि सुप्रसिद्ध सिने-पार्श्वगायक, लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे यांना लोककला क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी अखिल भारतीय नाट्य परिषदेचा अत्यंत प्रतिष्ठेचा सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. याच अनुषंगाने मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन, महात्मा गांधी मिशन, अभ्युदय फाऊंडेशन व नागरिकांच्या वतीने डॉ. गणेश चंदनशिवे यांचा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार सोहळा आज एमजीएमच्या रुक्मिणी सभागृह येथे पार पडला. या सत्काराला उत्तर देताना डॉ.

या सत्काराला उत्तर देताना डॉ. चंदनशिवे बोलत होते.

यावेळी मंचावर एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, ज्येष्ठ अभिनेते प्रा.डॉ. दिलीप घारे, डॉ. दिलीप महालिंगे, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, नीलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, विजय राऊत, डॉ. शिव कदम आदि मान्यवर उपस्थित होते.



माझा सन्मान जगभर होतो मात्र, आज हा माझ्या मातीतील लोकांनी केलेला सन्मान माझ्यासाठी महत्वपूर्ण असून तो कितीतरी मोठा आहे. आपल्या मायभूमीत आपला गौरव होणे यापेक्षा मोठे काहीही नाही. टेंभुर्णीच्या ग्रामीण रुग्णालयात सफाई कामगार म्हणून सुरू झालेल्या माझ्या प्रवासात अनेक दृश्य आणि अदृश्य माणसांनी माझ्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला असून त्या सर्वांचा मी कायम ऋणी आहे. माझ्या जडणघडणीत माझ्या कुटुंबियांसह शिक्षकांची भूमिकाही अत्यंत महत्वपूर्ण राहिलेली आहे, असे डॉ. चंदनशिवे म्हणाले.

आपली मराठवाड्याची भूमी कलेच्या सर्व क्षेत्रात कुठेही कमी नाही. सर्व कलांमध्ये आपल्या भागातील कलावंत उत्तम आणि प्रतिभासंपन्नतेने काम करत आहेत. डॉ. चंदनशिवे यांना आज सन्मानित करत असताना मनापासून आनंद होत असल्याचे एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम यांनी सांगितले.

**गणेशकडे ग्रामीण शहाणपणः**

गणेशकडे ग्रामीण शहाणपण असून ते त्याच्या विचारांत आणि वागणुकीत सहजपणे जाणवते. कलेच्या क्षेत्रात दुर्मिळ मानली जाणारी विनयशीलता त्याच्यात आहे आणि ती दिखावा न करता नैसर्गिकपणे प्रकट होते. तो यशाच्या शिखरावर पोहोचला असतानाही जमिनीशी नातं बाळगून आहे. त्याला आवाजाची नैसर्गिक देणगी लाभली आहे, असे ज्येष्ठ अभिनेते प्रा. डॉ. दिलीप घारे यावेळी बोलताना म्हणाले.

**गणेशला शत्रूच नाहीतः**

डॉ. गणेश चंदनशिवे यांचा आज होणारा सन्मान हा आमच्यासारख्या शिक्षकांसाठी अभिमानाचा क्षण आहे. कलाक्षेत्रात आपल्याच क्षेत्रातील आपले शत्रू असण्याची शक्यता अधिक असते, मात्र गणेश हा त्याला अपवाद आहे. त्याला शत्रूच नाहीत. येणारा काळ कलावंतांसाठी निर्णायक असून अशावेळी गणेशने नवोदित कलाकारांना घडवून त्यांच्यासाठी आधारवड व्हावे, असे डॉ. दिलीप महालिंगे यांनी सांगितले.

सत्कार सोहळ्यानंतर डॉ. चंदनशिवे यांचे विशेष कला सादरीकरण झाले. या सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश राऊत यांनी केले. सन्मानपत्र वाचन श्रीकांत देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिव कदम यांनी केले तर आभार महेश अचिंतलवार यांनी मानले.

***




## जात्यावरच्या ओव्या......

दु:ख माझे सुख
सांगू कोणाच्या जवळी
राघूची गं माझ्या
शीण बाळाची कवळी ||१३५||

मांडवाच्या दारी
हंडा घंगाळ तांब्याचं
रुसला नवरदेव
झाड मागतो आंब्याचं ||१३६||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# (सहन) शीलं परमं भूषणम्
## सहनशीलतेतून तेज निर्माण करणारे जीवनमूल्य




ज्योतिर्मय साहित्य


ही तर भूतकाळातील उदाहरणं झाली पण अलीकडच्या काळात अनेक समाजसुधारकांना, देशभक्तांना प्रचंड छळाला सामोरे जावं लागलं आहे. स्वातंत्र्यासाठी म. गांधींनी प्रत्यक्ष न लढता इंग्रजांच्या धोरणांना विरोध करून त्यांचा छळ सहन केला. सत्याग्रहाचे त्यांचे अस्त्र म्हणजे सर्वोच्च सहनशीलतेचे उदाहरण. स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, राजगुरु, वासुदेव बळवंत फडके यांच्यासारखे महान देशभक्त इंग्रजांच्या छळाला धैर्याने सामोरे गेले. साने गुरुजींनी समाजाचा छळ, उपेक्षा, अपमान सहन केला पण श्यामची आई  सारखा करुणेची वर्षा करणारा अमृतग्रंथ जगाला दिला. म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांना तर समाजाच्या केवढ्या रोषाला सामोरे जावे लागले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाट्याला सुद्धा प्रचंड उपेक्षा आणि अपमान आला. पण ते विष त्यांनी धैर्याने पचवले.



महर्षी कर्वे यांच्यासारख्या विधवांच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारकाला समाजाने केवढा त्रास दिला. पण त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. अशी खूप उदाहरणे आहेत. लोकनिंदेचे, टीकेचे जहर या सगळ्यांनी पचवले पण समाजाला अमृतच दिले. म्हणूनच ही माणसे आभाळाएवढी उंच झाली, महान झाली.

सर्वे गुणा: कांचनमाश्रयंते. ज्याच्याकडे पैसा त्याच्याकडेच सगळे गुण आहेत असे आज मानले जाते. पैसा हेच शील झाले आहे. असे असले तरीही शील  आजच्याही काळासाठी अपरिहार्य आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि असहिष्णू वातावरणात आपल्याला श्रीरामांची मर्यादा, गांधीजींचा संयम, अहिल्याबाईंचा धीर, ज्ञानेश्वरांची विनयशीलता आणि तुकारामांची श्रद्धा पुन्हा शिकण्याची गरज आहे. शील हे बाह्य वर्तन नाही  ते अंत:करणातील प्रकाश , तेज आहे. शीलं परमं भूषणम्  म्हणजे जिथे व्यक्तिमत्त्व सौंदर्याचं मोजमाप फक्त ज्ञान, संपत्ती, किंवा सामर्थ्याने नव्हे तर त्याच्या संयम, सहनशीलता आणि शुद्ध आचरणाने केलं जातं.

शेवटी एक छोटी प्रार्थना:
“ हे जीवन! दे संयम असा,
संकटांतही न डगमगता
शील राखू, सहन करू,




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## वंदन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कारें लीनता घडे। नमस्कारें विकल्प मोडे। नमस्कारें सख्य जडे।नाना सत्पात्रासी।।

नमस्कार करणे म्हणजे वंदन करणे. चरणीं लीन होणे. शुध्द सात्विकतेचं लक्षण म्हणजे नमस्कार होय . आपल्या संस्कृतीत नमस्काराला खुप महत्व आहे

सकाळी ऊठल्या बरोबर दोन्ही हात चोळून ते चेहऱ्यावर लावतात मग भुमीला वंदन करतात, देवाला नमस्कार करतात.


कराग्रे वसती लक्ष्मी: करमध्ये सरस्वती।
करमूले तु गोविंद: प्रभाते करदर्शनम्

आपल्या दिवसाची सुरवात अशी व्हायला हवी.

उठोनिया प्रात:काळीं।वदनी वदा चंद्रमौळी, श्री बिंदुमाधवाजवळी स्नान करा गंगेचे.।। अंगी नम्रता असली तर अभिमान क्षीण होतो. आणि साष्टांग नमस्कार घातला तर नम्रता सहज.साध्य होते. आपल्या भोवताली असलेल्या प्राणीमात्रांना प्रत्यक्ष भगवंत समजून त्याला नमस्कार केला तर तो परमेश्वरा पर्यन्त पोहचतो. खरं तर वंदन भक्तित मला संतांनी सांगितलेले एक वाक्य या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते ते म्हणालेजे जे भेटेल भूत तया मानीयले भगवंत

हे जर खरे तर ज्या ज्या जीवाशी आपला संबंध येईल त्या त्या जीवाच्या अवगुणांकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणांनाच पहाण्याची आपली मानसिकता असली पाहिजे. एकदा का ही कला साध्य करता आली की सर्व गुणांचे अधिष्ठान असणारा परमेश्वर आपोआप मनाला भासायला लागतो.आपण समोरच्याला केलेले वंदन त्यांच्या बाह्यांगाला नसून त्याच्या अंतरंगातील अनंताला असते. अशी विचारधारा असली की जिकडे तिकडे भगवंत दिसतो. देहाभिमान गळून पडतो व साधक सर्वांशी लीनपणे ,समरसपणाने वागतो. ज्याला ही वंदनभक्ति साधली की त्याच्या जीवनात चमत्कार घडून येतो. म्हणजे वंदन भक्ति ही परमार्थ साधनेत विलक्षण आहे हे या सहाव्या समासात समर्थानी सांगितले आहे.

# सुख त्यागात आहे, भोगात नाही.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

अमुक हवे असे वाटले आणि ते मिळाले नाही, म्हणजे दु:ख होते. अमुक हवे असे वाटूच देऊ नये. परमात्मा ठेवील त्यात समाधान मानावे. याचेच नाव वैराग्य. आपण विषयांत बुडतो आहोत, आणि पुन: विषयाचीच कास धरली तर आपण अधिकाधिक नाही का बुडणार ? विषयाची आस धरणे म्हणजे त्याचे दास होण्यासारखेच आहे. मनुष्य सुखाकरिता धडपड करतो, आणि अंती दु:खमय अशा विषयाची आशा करतो. सुख त्यागात आहे, भोगात नाही, हे पुष्कळांना पटत नाही.

परिसाला लोखंड लागले म्हणजे त्याचे सोने होते, पण रुप्याचे काही सोने होत नाही; तसे आपण दीनाहून दीन, म्हणजे अभिमानरहित झाले पाहिजे, आणि असे झाले म्हणजेच परमात्म्याला अनन्य शरण जाता येईल. हे व्हायला त्याची कृपाच पाहिजे, आणि ती नित्य भाकावी. एखाद्या गोष्टीने आपले मन अस्वस्थ होते ते का बरे ? त्या गोष्टीला आपण सत्यत्व देतो म्हणून. हा सर्व खेळ आहे, हे मिथ्या आहे, असे जाणून, ज्याप्रमाणे नट नाटकातली आपली भूमिका अगदी खऱ्यासारखी करतो, त्याप्रमाणे व्यवहार करावा. सुख, समाधान, सत्यात असते, मिथ्यात नसते. आजपर्यंत आपण विषय उपभोगले पण त्यांत आपल्याला सुख झाले नाही; मग विषय मिथ्या आहेत याची भगवंताने तुम्हांला प्रचीती नाही का दिली ? तरीसुद्धा तुम्ही या विषयांतच प्रपंच कसा सुधारेल असे मला विचारता, याला काय म्हणावे ? जे दु:खमयच आहे त्यात सुख कुठून मिळणार ? दोन लहान मुली भातुकली खेळल्या; जी मुलगी गरीब होती तिने पोळ्या आणि गुळांबा केला, पण जी श्रीमंत होती तिने मात्र श्रीखंड आणि बासुंदी केली. पहिलीचा गुळांबा जितका पोट भरण्याला उपयोगी नाही, तितकेच दुसरीचे श्रीखंडही उपयोगी नाही. तसे प्रपंचाचे खरेपण आहे. प्रपंच असण्यासाठी बायको आणि मुले यांची गरज आहेच असे नाही; जो दुसऱ्यावर अवलंबून असतो तो प्रपंचीच असतो. म्हणून मनुष्य एकटा असला तरी प्रपंचीच असतो. दुसऱ्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य हा प्रपंची होय. पाचजण मिळून प्रपंच बनतो. त्यामध्ये प्रत्येकजण स्वार्थी असतो. मग सर्व सुख एकट्यालाच मिळणे कसे शक्य आहे ?

प्रपंचामध्ये अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचामध्ये कितीही वस्तू आणल्या तरी पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही. भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन: ती आणायला नको.

अमुक एक वस्तू आहे म्हणून मी सुखी आहे या वृत्तीत राम नसून, काही नसताना वृत्तीचे समाधान टिकले पाहिजे.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

विज्ञानाचे ज्ञान अज्ञानी घनवट
ज्ञाने अज्ञान नीट लाविले दिसे
मी तू हे मात हरपले दृष्टांत
ह्रदयी ह्रदयस्थ निजतेजे १
साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा २
बाप रखुमादेवीवरु ह्रदयस्त घटी
बिंबोनी उफराटी कळा दिसे ३

ज्ञानेश्वर माऊलीच्या हा एक अत्यंत गोड असा अभंग आहे. याची आज आपण उकल करून पाहू यात. यात येणारे शब्द जसे ज्ञान, विज्ञान, अज्ञान या शब्दांचा नेमका अर्थ काय हे आपण पाहू.

या २१व्या युगात आपण सर्वजण स्वतःला विज्ञाननिष्ठ समजतो. आणि विज्ञान हे सदैव सिद्ध झालेले व अचूक असे ज्ञान आहे, असे आपण मानतो. अध्यात्मात विज्ञान कशाला म्हणतात व ते ज्ञानापेक्षा कसे फिके पडते याचे विवेचन करणारा अभंग असल्याकारणाने प्रथम आपण या तीन शब्दांचा नेमका अभिप्रेत अर्थ कोणता हे पाहू.

ज्ञान : ज्ञान म्हणजे आत्म्याचा अनुभव. आपण ज्याला माहिती समजतो किंवा विविध विषय जसे वैद्यक शास्त्र व्यापार, तंत्रज्ञान ,भौतिकशास्त्र रसायनशास्त्र इत्यादी ही या शास्त्रांचे  ज्ञान यालाच आपण ज्ञान समजतो.

आपण अध्यात्माचा विषय निघाला तर धर्मशास्त्राच्या माहितीला ज्ञान समजतो. पण प्रत्यक्षात असे नाही. फारतर या ज्ञानाला शब्द ज्ञान म्हणा, पण अध्यात्मात जेव्हा जेव्हा ज्ञान हा शब्द येतो तेव्हा तेव्हा त्याचा अर्थ आत्म्याचा अनुभव हाच होतो.

आपल्या आत्म्या भोवती  अविद्देचे आवरण आहे. अविद्या ही चार भागांनी बणलेली असते. राग द्वेष मोह अस्मिता व अभिनवेश. या अविद्येच्या आवरणामुळे मुळात स्वयंप्रकाशित असणारा आत्मा हा मलीन झाल्यासारखा भासतो. हे अविद्याचे आवरण योग साधने द्वारे हटले की तो तेजपुंज स्वयंप्रकाशित आत्मा पुन्हा दैदिप्यमान भासतो. आपले प्राण, मन, बुद्धी व अहंकार हे अंतकरण चतुष्ठय जे स्वाभाविकतः खाली म्हणजे प्रवृती धर्माकडे, म्हणजेच विषय वस्तू आणि व्यक्ती यांच्याकडे आकर्षित झालेले असतात. ते उलट बाजूस म्हणजे वर आत्म्याकडे वळवावे लागतात. योग साधनांनी व विविध प्रयोगांनी अविद्याचे मळभ हटून स्वयंप्रकाशित आत्म्याचा दिव्य प्रकाश बुद्धीवर पडतो व बुद्धीत विवेकाचा जन्म होतो. हा बुद्धीत पडणारा प्रकाश म्हणजेच आत्मदर्शन होय. यालाच ज्ञानप्राप्ती झाली असे म्हणतात. थोडक्यात आत्म्याचा अनुभव म्हणजे ज्ञान.

या स्थितीत प्राण उर्ध्वनेता झालेल्या असल्यामुळे त्याचा आवेग ओसरलेला असतो. मन हे निष्पन्द झालेले असते. मनात उठणारे विचार थांबलेले असतात, व मन मृत्युपंथाला लागलेले असते. मी तू पणाचा भावही संपलेला असतो. आणि अहंकार (म्हणजे शरीराची जाणीव देह भावाची जाणीव) हिही लोक पावलेली असते.

एकंदरीत स्थितीच्या अनुभवास ज्ञान म्हणतात

विज्ञान : विज्ञान म्हणजे गतीचा अनुभव. यात असंख्य गोष्टी ज्या आपल्या भोवती असतात, अणुरेणू पासून सर्वत्र गती आहे. अणू मध्ये सुद्धा इलेक्ट्रॉन्स सतत गरगरत असतात. ग्रह तारे गरगरत असतात. या गतीच्या अनुभवास विज्ञान म्हणतात.

अज्ञान :  मूळ परमात्मा परब्रम्ह एकटेच अंधकाराच्या गुहेत पहुडले होते. जेव्हा त्यास असे वाटले की आपण एकटे आहोत, आणि आपण बहु व्हावे. त्याच्या या संकल्प सरशी तेथे  प्रचंड स्फोट झाला आणि सर्वप्रथम ओंकार नाद प्रगटला व रूक्म वर्णाची आदिमाया रुक्मिणी प्रकट झाली. हीच ती महामाया.

(क्रमशः)

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं यशो देहि रिपुंजहि।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं भवेत् सर्वं शुभं शुभम्।। ४५ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. यश दे. शत्रूचाविनाश कर. जगदंबिके, तुला नमस्कार असो. सर्व काही शुभ शुभ व्हावे.

**जगदम्ब नमस्तुभ्यं नित्यं मे कुरु रक्षणम्।**
**अशुभात् रक्ष मे देवि मातृके रेणुके सदा।। ४६ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझे नित्य रक्षण कर. हे देवी, रेणुका माते, अशुभापासून माझे सदैव रक्षण कर.

**जगदम्ब नमस्तुभ्यं करणीया कृपा त्वया।**
**नित्यं तिष्ठतु ते नाम वाचि स्मृत्यां च मे शुभे।।४७ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू कृपा करावीस. हे शुभे, तुझे नाम नित्य माझ्या वाणी आणि स्मरणात राहो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.



आरोग्य संजीवनी

# घशातील जंतुसंसर्ग (थ्रोट इन्फेक्श)

ज्योतिर्मय साहित्य

घशाचा दाह किंवा घशात खवखवणे ह्या आजाराला शास्त्रीय भाषेत फॅरेनजायटिस असे म्हणतात. म्हणजे जंतू दोष अथवा जंतुसंसर्ग होय हे सर्दी किंवा फ्लू प्रमाणेच घशाला होणारे एक व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते.

घसा दुखणे किंवा खवखवणे, बोलताना किंवा गिळताना घसा दुखणे, गिळायला त्रास होणे, टॉन्सिल्सला सूज येऊन ते लाल होणे, टॉन्सिल्सवर पांढरे चट्टे उठणे किंवा त्यावर पस तयार होणे ही फॅरिन्जायटिसची कॉमन लक्षणे आहेत. घशाला हा त्रास होत असताना शरीर सुद्धा ह्या इन्फेक्शनची ताप, खोकला, नाक सतत वाहणे, अंगदुखी, डोकेदुखी, शिंका, मळमळ किंवा उलटी होणे ही लक्षणे दाखवत असते. मोठी माणसे हे सगळे काही प्रमाणात सहन करू शकतात. पण लहान मुलांना श्वास घेण्यास त्रास होतो. तसेच गिळताना त्रास होतो आणि त्यामुळे सतत तोंडातून लाळ गळत असते. असे झाल्यास त्यांना त्वरित डॉक्टरांकडे नेणे आवश्यक आहे.

उपाययोजना

१) घशाची सूज उतरण्यासाठी आपल्याला गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करा.

२) सुंठ, गवती चहा, ज्येष्ठमध, हळद, पुदिना यांचा चहा करा लिंबू पिळून प्या.

३) घशाला झालेले इन्फेक्शन घालवण्यासाठी पेरूचे पान अत्यंत उपयुक्त आहे. पेरूच्या पानात आयुर्वेदिक गुणधर्म आहेत. ते चाऊन अथवा उकळून रस प्या.

४) थंडीमध्ये घशाचे इन्फेक्शन होणे ही अतिशय सामान्य समस्या आहे. याच्या जोडीला येणारा ताप, सर्दी यामुळे आपण हैराण होऊन जातो. पण वाफ घेणे हा यारील सोपा उपाय आहे. घरच्या घरी गरम पाणी करुन त्याची वाफ घेतल्यास घशाला आराम पडतो. दिवसातून दोन ते ती वेळा हे केल्यास इन्फेक्शन कमी व्हायला मदत होते.

५) घसा दुखत असल्यास काहीतरी गरम पिण्याची इच्छा होते. अशावेळी गरम काढा प्यायल्यास त्याचा निश्चित फायदा होतो. काढा मध्ये तुळस, लवंग, आले घातल्यास घशासाठी तो जास्त उपयुक्त होतो. असा काढा दिवसातून २ वेळा घेतला तरी घशाला आराम मिळतो.

६) दोन मिर्याची पुड किंचित हळद, किंचीत काथाची पुड मधात घ्यावी.

७) काथाची फुड गरम पाण्यात घेतल्यास घसा सुटतो.

८) गरम पाण्यात एक लिंबू रस घ्यावा

९) लसणाची पाकळी पिठी साखरेत घालून खायची.

१०) मध व जेष्ठीमध पावडर, व हळद, कोरफडीचा गर आवाजा साठी एकत्र करून चाटावा. दोन वेळा.

११) घसा दुखत असल्यास आल्याचा तुकडा तोंडात ठेऊन चावा. त्यामुळे तुम्हाला लवकरआराम मिळेल.

१२) आल्याचे चार तुकडे, दोन टोमॅटो, मध यांचा रस करुन प्या.

१३) पाण्यात कांदा टाकून उकळा व गाळून त्यात कोमट झाल्यावर मध टाकून ते पाणी थोडयाथोड्या वेळाने प्या.

१४) मधात काही लवंगा टाका. काही तासांनी लवंगा काढून त्याचे चाटण खा. लवंगामुळे वेदना कमी होतील व मधाने घशाला आराम मिळेल.

(१५) पाण्यात बडीसोप टाकून ते काही मिनीटे उकळा त्यानंतर पाणी गाळून घ्या व त्यात मध टाकून थोड्या थोड्या वेळाने प्या.

(क्रमशः)

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

लग्न झाले की प्रत्येक सून सुरुवातीस नम्रच असते हळू हळू ती नम्री होते.   सीतेला हे सांगण्याची गरजच नव्हती त्या आधीच प्रगल्भ होत्या. पण त्या निमित्ताने हा उपदेश आपणास केला आहे. विचारी माणसाला दुःख होतच नाही ,असे नाही पण आपणास दुःखाचा कालावधी कमी करता आला पाहिजे. या चार सुनांना घेऊन ते सर्व अयोध्ये कडे जाताना कांहीं शुभ शकुन आणि कांहीं अशुभ शकुन झाले. कावळा घरावर बसला की पाहुणे येतात.म्हणून बायका कावळ्या उडवतात.काळया दाताचा पुरुष स्वप्नात आला तर मृत्यू जवळ आला आहे हा संकेत आहे. अचानक

भगवान परशुराम समोर आले. या रामाने आपल्या आराध्याचे धनुष्य तोडले म्हणून त्यांना राग  आला होता. त्यांच्यात व रामात युद्ध झाले. रामांनी परशुरामास पराजित केले. त्यानंतर  सर्व पुढे निघाले. त्यांचे भव्य स्वागत अयोध्यावासी यांनी केले. असे म्हणतात अयोध्या वासी कायम नटून थटून दिवसभर रहात असत. उत्सवाची भूमी म्हणजे अयोध्या. त्यांना असे वाटले की आता आपल्या आयुष्यात अखंड आनंदच राहणार आहे. दशरथ व राण्या यांना मुले सुना पाहून धन्यता वाटली. आता दशरथाच्या मनात निवृत्तीचे वेध लागले.आपण प्रपंचात विषयी किती वेळ ममत्व ठेवणार हे आपल्याला कधीतरी समजले पाहिजे. मनाची तयारी आधी हवी की कोणत्याही क्षणी आपण हे जग,प्रपंच सोडण्यास आपण लगेच तयार असू आपल्याला हा प्रपंच, व्यक्ती,जग सोडून जायचे ना मग यांचे बद्दल ममत्व सोडले पाहिजे. (क्रमशः)

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

## फुलमाला....



लसण्या फुलांची वेल

या वेलींच्या पानांना लसणासारखा वास असतो
म्हणून याचे नाव लसण्या.
ही फुले भरभरून फुलतात आणि मोहक असती
दिसण्या.

फुलताना या फुलांचा रंग गडद असतो पण हळूहळू
फिकट होत शेवटी पांढरा होतो.
चार-पाच दिवस टवटवीत राहणारा हा वेल जिथे
फुलेल तो भाग सुशोभित करतो.

या वेली ची प्रत्येक गोष्ट आयुर्वेदिक, उपयोगी
आणि औषधी
कुठल्याही किडे अन् डास दूर करण्यासाठी याचा
उपयोग होतो आधी.

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

# दवाखाना

## रामरसाची महती

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मंडळी !

सर्वप्रथम आपण सर्वांना धो-धो करीत धोपटणाऱ्या पावसाळी पर्वाच्या आरोग्यवर्धिनी शुभेच्छा !

पाऊस म्हटलं की कडक मीठी चाय अन कढईतून निघालेली नवजात गरमागरम कांदाभजी यांना पर्याय नाही. म्हणूनच मी देखील आपल्या दवा-खान्याच्या रुटीन रस्त्याला सोडून असतांनाच आडमार्गावरील एक वेगळी मार्गिका शोधायचं ठरवलं. नवविचारांची नौका दोलायमान स्थितीत असतांनाच केबीसीचा एक भाग अचानक नजरेसमोर आला. बालकदिनानिमित्य बालकांतीलच (यांची अचाट बुद्धी बघतांना बाळबुद्धी हा शब्द अगदीच आऊट ऑफ सिल्याबस वाटत होता !) एका बाळराजाचे किचनमधील कवतिक बघतांना त्याच्या इच्छेखातर त्याचे दैवत असलेले साक्षात रसोईकिंग संजीव कपूर त्याच्या भेटीस ऑनलाईन स्क्रीनवर अवतरले. या बाळाने त्यांना जो प्रश्न विचारला तो किचनमध्ये प्रथम प्रवेश करणाऱ्या तमाम नुकत्याच लगीन झालेल्या नवख्या महाराण्यांना पडत असतो. त्याने कपूर महाशयांना विचारले, ''एखाद्या पदार्थात स्वादानुसार मीठ घालणे म्हणजे नेमके किती?'' हा यक्षप्रश्न मला माझ्या किचनच्या प्रारंभिक कारकिर्दीत हैराण करीत असे. चमचा नामक वस्तूचे परिमाण (पदार्थ खारट होण्याचे परिणाम भोगल्यानंतर) या बाबतीत कुचकामी आहे हे लक्षात आले. याचे विश्लेषण करतांना मला एक विनोद म्हणून कुणीतरी छापलेला सिरीयस मुद्दा आठवला.

मैत्रांनो, डॉक्टर पेशंटला एका गोळीचा डोज समजावून सांगतोय. ''एक एक गोळी दिवसाला दोन वेळा अशी १० दिवस घ्यायची.'' हा संदेश ऐकल्यावर वेगवेगळ्या पेशंटची तीन प्रकारची प्रतिक्रिया (मन की बातच्या रूपात) असते.

नंबर एक- ''आता हे असे १० दिवस गुंतून राहण्यापेक्षा एक गोळी दिवसाला ४ वेळा घेऊन ५ दिवसात ही कटकट संपवतो''. नंबर दोन- ''याला माझ्या शरीराचे प्रॉब्लेम काय कळणार ? या गोळ्या लय गरम असतात. मी आपला दिवसाला एकच गोळी घेणार.'' नंबर तीन- ''डॉक्टरांनी सांगितलंय ते लक्षात ठेवणे माझे काम आहे. पूर्ण डोज व्यवस्थित घेईन तेव्हांच पूर्णपणे वेळेत बरा होईन''

(आपणच ठरवा, आपण कुठल्या क्रमांकावर असावे! हे उदाहरण औषधांच्या बाबतीत दिले. मला औषधे सोडून इतर कांही दिसत नाही हे माझ्या व्यवसायाचे हे साईड इफेक्ट समजा मंडळी!)




आता सांगा, दोन वेळचे मीठ (रामरस) एकाच वेळच्या भाजीत घातले तर ? किंवा एक चिमूटभर टाकायचे ते अर्धी चिमूट टाकले तर ? एक वेळ भाजी अळणी असेल तर वरून मीठ घ्यायची सोय आहे, पण खारट भाजी असेल तर ? अथवा गॅसच्या दोन शेगड्यांवर दोन जणांच्या फर्माईशनुसार वेगवेगळ्या भाज्या शिजवतांना एका भाजीत डबल मीठ अन दुसऱ्या भाजीत कांहीच नाही असे झाले तर? (हे अनुभव गाठीशी आहेत म्हणून तर उदाहरण देतेय!) मंडळी, 'अळणी भाजी' रांधणारी दुसरी तिसरी कुणी नसून कारागृहात बंदिस्त असलेल्या सानेगुरुजींच्या लेखणीतून मोजून फक्त चार रात्रीत साकार झालेली अजरामर झालेली शामची आई आठवतेय कां? बरं, इंग्रजीत देखील उदाहरण आहे ते प्रसिद्ध साहित्यिक शेक्सपियर यांच्या जगप्रसिद्ध नाटकातील किंग लियरच्या धाकट्या कन्येचे. बापाला अळणी जेवण खायला देत ती ''बाबा, माझे तुमच्यावर मिठाइतकेच प्रेम आहे!'' असे सांगत स्वतःचे अनन्यसाधारण प्रेम पटवून देते.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव


आपण दर नववर्षी कांही संकल्पना मनाशी ठरवतो. (कांही मंडळी त्याच संकल्पना दर वर्षी राबवतात !) वरील मॅटर वाचून आपल्याला याची जाणीव झाली असेलच की प्रमाणबद्ध शरीरासारखेच प्रमाणशीर मीठ आपल्या आरोग्यासाठी अतिशय मोलाचे आहे. त्यासाठी एक चुटकीभर नमक की कीमत आपण नव्याने करावी असे नाही. स्वातंत्र्यलढ्याचा मानबिंदू असलेला जाज्वल्य मीठ सत्याग्रह आपल्याला माहीत आहेच. मिठाचा अतिरेक उच्च रक्तदाब, हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, आम्ल-आम्लारि असमतोल, शरीरावरील सूज इत्यादी विकारांना जन्म देतो. मंडळी, आम्ल म्हणजे ॲसिड आणि आम्लारी (आम्लाचा अरी अर्थात शत्रू) म्हणजे अल्कली! मराठी आणि संस्कृत भाषा अतिशय समृद्ध आहे तसेच वैज्ञानिक इंग्रजी शब्दाला या आपल्या भाषांत किंवा त्यांच्या मिश्रणात सुंदर पर्याय आहे याची मला या लेखमालेद्वारे खात्री पटत चालली आहे.


मैत्रांनो, आपल्या रोजच्या भाजीतील मिठाव्यतिरिक्त लोणची, पापड, चटण्या, विविध जंक फूड, प्रक्रिया केलेले पदार्थ इत्यादीत मिठाचे प्रमाण जास्त असते, कारण इथे ते पदार्थाचे संरक्षक कवच म्हणून उपयोगात आणल्या जाते. याखेरीज पानाच्या डाव्या बाजूला शुद्ध मीठ वाढण्याची परंपरा आहे. या सर्वांतील मिठाचे प्रमाण कमी करता येईल कां? याचा विचार आपल्या रोजच्या समतोल आहाराच्या संकल्पनेत जोडायला हवा असे मला वाटते.

घरच्या गृहिणीच्या हातात पाळण्याची दोरी असतेच, पण त्याशिवाय घरच्या मंडळींकरता सकस आणि पौष्टिक अन्न रांधायची देखील महत्वाची जबाबदारी असते. तिने मनांत आणले तर अतिरिक्त मीठ सेवन करण्याला बऱ्याच अंशी आळा बसू शकतो. मिठाचे प्रमाण उलीसे कमी झाल्यावर घरची मंडळी प्रारंभी कुरकुरत पण नंतर त्याचीच सवय लागून कमी मिठाचे जेवण खायला लागतील. पानाच्या डावीकडील अधिक मीठ असणारे पदार्थ देखील कमीत कमी खावेत. मिठाचा संपूर्ण त्याग करण्याचे कुणीही मनांत आणू नये. त्याचे देखील वाईट परिणाम होतात. कारण शरीरातील पेशींच्या कार्यात मिठाचे कार्य मोलाचे आहे. म्हणूनच या मिठाला संतमंडळी 'रामरस' असे संबोधतात. किती सुंदर कल्पना आहे ही ! जसे रामरसाशिवाय जेवण रसहीन आहे तसेच रामनामाविना जीवन देखील रसहीन आहे हा त्यातील संदेश आहे.

निर्जलीकरण (डिहायड्रेशन) करता ओआरएस अत्यंत उपयोगी आहे, परंतु ते लगेच उपलब्ध नसेल तर जागतिक आरोग्य संघटनेने सोपा फॉर्म्युला दिला आहे. घरगुती मीठ तीनचतुर्थांश चहाचा चमचा (टी स्पून), खाण्याचा सोडा १ चमचा, एका संत्र्याचा रस (नसल्यास कोणतेही लिंबूवर्गीय फळ) हे सर्व एक लिटर (उकळून घेऊन थंड केलेल्या) पाण्यात मिसळून बाधित व्यक्तीला द्यावे. प्राकृतिकरित्या आपल्याला क्षार आणि आम्ल पुरवणारे नारळ पाणी तर खरेखुरे अमृततुल्य ऊर्जावर्धक द्रव. आमच्या लहानपणी आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत नागपूरला घरापासून जवळपास १. ५ मैल दूर अशा निसर्गरम्य अंबाझरी तलावाच्या काठच्या बागेत फिरायला पहाटे पहाटे जात असू. परत येतांना रस्त्याच्या किनारी माठात संचय केलेली अगदी स्वस्त अशी थंडगार नीरा विकणारी माणसे भेटायची. आमच्यासारख्या कित्येक थकल्या भागल्या जीवांसाठी ती कूल कूल नीरा पिण्याचे परमसुख कांही वेगळेच असायचे. ('नीर' आणि 'नीरा' या शब्दांत किंचितच फरक असला तरी त्यांचे घटक वेगळे आहेत.) ही नीरा पहाटेच प्यावी कारण सूर्यप्रकाशाद्वारे नीरेचे रूपांतर ताडीत होते. कुठल्याशा प्रक्रियेद्वारे असा बदल टाळल्या जाऊ शकतो असे वाचल्याचे स्मरते. हे मात्र नक्की की आरोग्यदायी घटकांचा विचार केल्यास बहुगुणी नीरा नारळपाण्यापेक्षा उजवी आहे.

नीरेसंबंधी आपल्याला अभिमानास्पद अशी माहिती देते. आपल्या देशातील प्रथम स्त्री जीवरसायनशास्त्रज्ञ डॉ. कमलाबाई सोहोनी (१८ जून १९११ - २८ जून १९९८) या भारतातील पहिल्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीधारक शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध पावल्या. त्यांनी १९३७ साली मुंबई येथून एम.एससी आणि इंग्लंडच्या प्रसिद्ध केंब्रिज विद्यापीठातून १९३९ साली पीएच.डी केले. त्यांच्या संशोधनाचा आवाका खूप मोठा आहे. आपल्या देशातील कित्येक अन्नघटकांच्या विस्तृत संशोधनासोबतच त्यांनी नीरा या उत्कृष्ट पेयातील उपयुक्त घटक आणि त्यांचे माणसांवर परिणाम याचे संशोधन केले. याकरता त्यांना त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट संशोधनाचे राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. अशा या नीरेची मला कधी तरी सय येते. पण आजकाल ती सहजासहजी दिसत नाही. मात्र त्यासाठी सूर्योदयापूर्वीचे फिरस्ते असणे आवश्यक!





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## चित्रकार रवींद्रनाथ - भाग एक

अवनींद्रनाथांचा स्टुडिओ हा विविध चित्रकारांचे एक आकर्षणाचे केंद्र होता. अनेक देशी-विदेशी चित्रकार या स्टुडिओला भेट देत असत. पण तरीही त्यावेळी चित्रकला हा विषय रवींद्रनथांना आकर्षित करू शकला नाही. त्याचे कारण म्हणजे रवींद्रनाथ साहित्य लेखनामध्ये गुंतले होते. त्यामुळेच वयाची साठी उलटल्यानंतर त्यांच्यातील कलाकाराला चित्रकलेच्या माध्यमातून व्यक्त व्हावे असे वाटू लागले. ते मोठ्या ओढीने चित्रकलेकडे जरी वळले तरी साहित्य निर्मितीकडे त्यांचे दुर्लक्ष झाले नाही. पण त्यानंतर झाले एवढेच की साहित्य निर्मिती हे त्यांचे एकमेव आकर्षण राहिले नाही. त्यांच्या चित्रकलेचा हळूहळू विकास होत गेला आणि त्यांचे चित्त वेधून घेणारे ते एक महत्त्वाचे माध्यम ठरले.

त्यांनी चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेतले नव्हते. या गोष्टीचा तसा त्यांना फायदाच झाला कारण त्यांना आपल्या मनाने ह्या कलेचा विकास करण्यासाठी नवनवीन प्रयोग करता आले. त्यासाठी त्यांच्यावर कोणतेही बंधन नव्हते. परंपरेला चिकटून राहण्याची आवश्यकता नव्हती. त्यांच्या चित्रात जे वेगळेपण दिसते त्याचे कारण त्यांनी आपल्या चित्रकलेत पारंपारिक दृष्टिकोन अवलंबला नाही हे असावे.

आपल्या साहित्य लेखनात दुरुस्ती करण्यासाठी किंवा नको असलेला भाग दर्शविण्यासाठी रवींद्रनाथ लहानपणी निळ्या रंगाच्या पेन्सिलचा वापर करीत असत. १९२४ पासून आपल्या लेखनातील अशा चुकांच्या दुरुस्त्यांकडे आणि खाडाखोडीकडे त्यांचे प्रकर्षाने लक्ष जाऊ लागले. या दुरुस्त्या त्यांना बघवत नसल्यामुळे त्या दुरुस्त्यांना एक चांगला कलात्मक आकार देण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली आणि त्यातूनच ते चित्रकलेकडे वळले.

चित्रकलेच्या प्रकटीकरणात रवींद्रनाथांनी नवनवीन प्रयोग केले. कुंचला हाताळण्याचे शिक्षण घेतले नसल्यामुळे रवींद्रनाथांनी त्यांच्या प्रथम चित्र रेखाटनात आणि रंगकारीत एका वेगळ्याच तंत्राचा अवलंब केला. त्यांच्याजवळ उपलब्ध असलेले साहित्य म्हणजे लेखणी आणि शाई. त्याचाच वापर त्यांनी सुरुवातीला करून घेतला. जेव्हा त्यांना कागदाच्या पृष्ठभागावर शाई पसरवायची असे तेव्हा ते लेखणीचा ( म्हणजेच टाकाचा ) मागचा भाग वापरत. नंतरच्या काळात मात्र त्यांनी आपल्या बोटांची टोके आणि कापडी बोळे किंवा चिंधीचाही वापर केला. त्यानंतरच्या पुढील काळात रंगीत पेन्सिली, ब्रश आणि रंगांचा उपयोग त्यांनी चित्र रंगवण्यासाठी केला.

एकलव्याप्रमाणे ते शिकत गेले, साधना करीत राहिले आणि त्यांच्या तंत्रात सुधारणा होत गेली. परिणामी त्यांच्या चित्रकलेचाही विकास होत गेला. वास्तव जगतातील प्राणी आणि पक्षी यांच्यापेक्षा नवनवीन आकार आणि आकृत्या त्यांच्या चित्रांमधून उदयाला येत होत्या. त्यांच्या विचार आणि भावनातून स्त्रियांचे चेहरे आणि मुखवटे आकार घेऊ लागले होते आणि ही नंतरची वाटचाल वास्तवतेकडे होणारी होती. त्यानंतरच्या त्यांच्या निसर्गचित्रांनी चित्रकलेच्या प्रांतात महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. त्यांच्या बऱ्याचशा चित्रांमध्ये सोनेरी रंगात तळपणारे दुपारचे निरभ्र आकाश आणि त्या प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेल्या झाडांच्या विविध आकृत्या पाहायला मिळतात.

त्यांच्या अनेक चित्रांमध्ये घुंघट घेतलेल्या स्त्रीचा लांबट चेहरा, धारदार नाक, पाणीदार बोलके डोळे या गोष्टी विशेषत्वाने आढळतात. त्यांच्या चित्रकलेतील या अविष्कारामागे कोणाची प्रतिमा त्यांच्या मनात असावी असा प्रश्न सर्वांना पडत असे. प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांनी त्यांना एकदा हा प्रश्न विचारला होता. तेव्हा रवींद्रनाथांनी हे रहस्य उघड केले. ते म्हणाले की त्यांच्या चित्रातील घुंघट घेतलेल्या स्त्रीचा चेहरा, धारदार नाक, बोलके आणि पाणीदार डोळे या सगळ्या गोष्टी त्यांची वहिनी कादंबरीदेवी हिची प्रतिमा त्यांच्या मनात असल्यामुळे त्यांच्या चित्रात सहजपणे आल्या. वहिनीची प्रतिमा त्यांच्या मनामध्ये चिरकाल टिकून होती. ते म्हणाले की वहिनीचे डोळे माझ्या मनावर इतके खोलवर ठसले होते की मी ते कधीच विसरू शकत नाही आणि जेव्हा जेव्हा मी चेहरा काढतो तेव्हा नेहमीच तिचा चेहरा आणि डोळे माझ्या दृष्टीसमोर साकार होतात. यातून त्यांचे आपल्या वहिनीवर असणारे प्रेम देखील आपल्याला दिसते. **(क्रमशः)**

## आपल्लम

ज्योतिर्मय साहित्य



ही एक विदर्भ आणि तेलंगणा येथील खूप जुनी परंपारीक सकाळी किंवा मधल्या वेळी खाण्याची डिश आहे. खूप टेस्टी, पोटभरीची दमदार शिवाय पौष्टिक डिश आहे. पूर्वी मिक्सर, ग्रँडर नव्हते, त्यामुळे आधीच घरात वेगवेगळी पिठे दळून तयार ठेवली जायची आणि मग त्यातीलच वेगवेगळ्या पिठाचे मिश्रण करून कधी थालीपीठे, आंबोळी किंवा धिरड्याचे वेगवेगळे प्रकार बनवले जायचे. पिठांमधून सत्व मिळून फायबरसही मिळतात. पोट सुद्धा व्यवस्थित भरते. कारण दिवसभरात खूप कष्टाची, धावपळीची कामे करावी लागत असत. म्हणून वेगवेगळ्या ज्या भाज्या उपलब्ध असतील त्या घालून तर कधी अगदी शिल्लक राहिलेल्या भाज्या घालूनसुद्धा वेगवेगळ्या पिठांचे प्रमाण कमीजास्त करून असे पदार्थ बनवले जायचे. त्यामुळे प्रत्येकवेळी नवीनच टेस्ट लागायची आणि अशा नाश्त्याचा मुळीच कंटाळा यायचा नाही उलट गरम गरम, खमंग नाश्त्याचा फडशा पडायचा. मग बघूया अशीच एक खमंग डिश.




साहित्य :

१ वाटी तांदूळ धुवून, सुकवून दळलेले बारीक पीठ, १ वाटी उडीदाच्या डाळीचे पीठ, १ चमचा धणे, अर्धा चमचा जिरे, पाव चमचा सुंठ पावडर, ५..६ हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, अर्धा चमचा छान भिजलेली मोहरी, पाव चमचा मेथ्याचीपूड, पाव चमचा बेकिंगसोडा, पाव चमचा हळद पूड, पाव चमचा हिंगपावडर चवीनुसार मिठ, तेल.

कृती :

सर्वांत आधी मोहरी किमान अर्धातास आधी भिजवून ठेवावी. मग एका बाऊलमध्ये तांदुळाचे पीठ, उडीदाच्या डाळीचे पीठ घ्यावे. आता त्यात हिंग, हळद, मेथ्याची, धने -जिरे यांची पूड, कोथिंबीर आणि मिरच्या एकदम बारीक चिरून घालाव्यात. चवीनुसार मिठ घालावे व सर्व व्यवस्थित मिक्स करून थोडे थोडे पाणी घालत गुठळ्या होऊ न देता डोशाच्या पिठाप्रमाणे थोडेसे सैलसर भिजवावे कारण पिठे भिजली की छान फुगतात हे लक्षात ठेवावे. आता हे मिश्रण घट्ट झाकून ठेवून ऊबदार ठिकाणी साधारण अर्धातास ठेवावे म्हणजे ते छान मुरते आणि फुगून हलकेपणा येतो.

आता अर्ध्यातासानंतर या पिठावरचे झाकण काढून पहावे .पीठ मस्त तयार झालेले असेल. आता त्यात भिजवलेली मोहरी व बेकिंग सोडा घालून भरपूर फेटावे. म्हणजे अजून जास्त हलकेपणा येतो आणि मस्त जाळी पडते. आता गॅसवर तवा ठेवून त्याला सुरुवातीला तेल लावून छान गरम करावा. व्यवस्थित गरम झाला की किंचित मिठाचे पाणी शिंपडावे व नारळाचा काथ्या किंवा चिंधी किना अर्धा कांदा कापून त्याने पुसावा. पुन्हा एकदा तसेंच सर्व करावे .याला तवा तयार करून घेणे म्हणतात. असे केल्यामुळे धिरडे, डोसे तव्याला मुळीच चिकटत नाहीत आणि तेल सुद्धा अगदी कमी लागते.

तवा तयार केला की त्यावर बॅटरचे १ डाव पीठ घालून गोलाकार पातळ पसरून घ्यावे .मग वरून किंचित तेल शिंपडून झाकण ठेवावे. एखाद्या मिनिटात मध्यम आचेवर आपल्लम तव्यावरून सुटते. मग उलथण्याने उलटून दुसऱ्या बाजूनेही खरपूस भाजावे.

हे गरमगरम आपल्लम सॉस, चटणी यासोबत सर्व्ह करावे

वैशिष्टय:

कांदा, लसूण किंवा कोणत्याही भाज्या नं घालतासुद्धा हे आपल्लम खूप खमंग, चवदार लागतात. कारण यात मेथ्या, भिजवलेली मोहरी, सुंठ यांचा एक वेगळाच स्वाद अप्रतिम येतो. यात खमंगपणाही असतो, किंचित सुरेख अशी कडसर चव असते. हिंगामुळे स्वाद तर छान येतोच पण पचायलाही उत्तम बनते. याचा केशरी लालसर आकर्षक रंग पाहूनच कधी खातो असे होऊन जाते .



## कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे संकल्प से सिद्धी चित्र रथ !

मा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली आहे. या निमित्त पूर्ण भारतात संकल्प से सिद्धी तक या उपक्रम अंतर्गत सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत; या मुळे ११ वर्ष केलेली यशस्वी काम जनमानसापर्यंत पोहच व्हावी हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत योग शिबिर, साफसफाई, एक पेड मा के नाम, जुन्या पारंपरिक विहिरी पुनर्जीवन करणे रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा, इत्यादी उपक्रम हाती घेतली आहेत.

शहरामध्ये आठवड्यापासून ही उपक्रम भाजपा मार्फत राबविली जात आहेत.

गेली वर्षभरात मोदी सरकार यांनी गरीब जनतेस, शेतकरी व सामान्य नागरिक यांच्या हिताची खूप कामे केली आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन कुलस्वामिनी तर्फे मोदी सरकार यांनी केलेल्या कामाचा व योजनेचा "संकल्प से सिद्धी "तक हा उपक्रम "इनोव्हा गाडी" विशेषरित्या सजवुन चित्र रथ बनवला आहे.

या चित्र रथावर जनधन योजना, मुली महिला साठी योजना, शेतकरी साठी योजना, निराधार यांना घर बांधण्यासाठी आवास योजना, उज्वला गैस योजना, आयुष्यमान भारत योजना इत्यादीची माहिती संपुर्ण गाडीवर स्टिकर द्वारे लावण्यात आली आहे. कुलस्वामिनी प्रतिष्ठानचा उद्देश हा की सर्व गरीब, सामान्य जनतेने हा लाभ घ्यावा.

मा डॉ.कराड भागवतजी, मा मंत्री अतुलजी सावे व भाजपा शहर अध्यक्ष मा किशोरजी शितोळे यांनी या चित्र रथाचे उद्घाटन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपाचे किरण पाटील, शिवाजी दांडगे, प्रशांत नांदेडकर,अमेय देशमुख,राहुल खरात, गणेश नवंदर, व सिडको परिसरातील असंख्य नागरिक उपस्थित होते. सर्वांना सेल्फी फोटो घेण्याचा मोह आवरला नाही.

मा राज्यपाल हरीभाऊ नाना बागडे यांनी विमान तळावर या चित्र रथास भेट देऊन प्रशंसा केली.

चित्र रथ संकल्पना व निर्मिती कुलस्वामिनीचे विलास व सौ अलका कोरडे यांची असून चित्र रथ पूर्ण करण्यासाठी चंद्रमुनी जायभाय, अनिल गावंडे, प्रल्हाद गायकवाड, अविराज कोरडे, संजय राठोड, ज्ञानेश्वर सागरे, राहुल नावकर, मजहर मंडीवाला यांनी दोन दिवस पूर्ण मेहनत घेतली.

हा चित्र रथ पूर्ण शहर परिसरात तसेच जिल्ह्यातून पण फिरवण्यात येणार आहे. असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कोरडे यांनी सांगितले आहे.

# क्रांतीकारक, विचारवंत आणि साहित्यिक - शिव वर्मा

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

जवळपास १६ वर्षे त्यांनी तुरूंगामध्ये हाल अपेष्टा सहन केल्या. कैदेतून सूटका झाल्यानंतर शिव वर्मा भारतीय कम्युनिष्ट पक्षात सामील झाले. १९४८ मध्ये शिव वर्मा यांची भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या उत्तर प्रदेश राज्य समितीचे सचिव म्हणून निवड झाली. शिव वर्मा हे सीपीआय (एम) यांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले. १९७१ मध्ये शिव वर्मा यांना कानपूर मधून सीपीआय (एम) चे खासदारकीचे तिकीट मिळाले. परंतु त्यांना त्यांचे प्रतिस्पर्धी सीपीआय समर्थित स्वतंत्र कम्युनिस्ट उमेदवार एस एम बॅनर्जी यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. शिव वर्मा यांनी भारतीय क्रांतीकारकांचे तथ्यात्मक चित्रण करण्याचा आणि त्यांच्याबद्दलच्या ध्रुवीकृत मतांना विरोध करण्याचा सतत प्रयत्न केला. ते तत्कालीन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र लोकलाहर आणि नया सवेरा चे संपादक होते. ते नया पथ या हिंदी मासिकाचेही संपादक होते. त्यांनी लखनौ येथील शहीद स्मारक आणि स्वातंत्र्य संघर्ष संशोधन केंद्राची स्थापना देखील केली.विशेषतः शिव वर्मा यांनी इतिहासात नोंद होण्याइतके क्रांतीकारकांवरील लेख, छायाचित्रे इत्यादी गोळा करण्यासाठी देशभर प्रवास करून सर्वांचे कागदपत्रांचे डॉक्युमेंटेशन केले. यासाठी त्यांनी लंडनमधील संग्रहालयास भेट देऊन माहिती गोळा केली. दीर्घकाळ तुरूंगवासातील कष्टमय जीवन व्यतीत करूनही मिळालेले आयुष्य त्यांनी आपल्या सहकाऱ्यांचे योगदान समाजापुढे आणले. हरदोई नगरपरिषदेने भारतीय क्रांतीकारकांचे देशासाठी समर्पित योगदान असलेल्या शिव वर्मा, जयदेव कपूर आणि हरी बहादूर श्रीवास्तव यांचे पुतळ्यासह स्मारक उद्यानामध्ये उभे केले आहे.शिव वर्मा यांचे १० जानेवारी १९९७ रोजी ९३ वर्षाचे दीर्घायुष्य मिळवून वृद्धापकाळमुळे निधन झाले. लेजेंड ऑफ भगतसिंग या चित्रपटात कपील शर्माने शिव वर्माची भूमिका साकारली आहे.

शिव वर्मा यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९०४ रोजी संयुक्त प्रांतातील हरदोई जिल्ह्यातील खाटेली गावात झाला. वयाच्या १७ व्या वर्षीच स्वातंत्र्याने प्रेरीत होऊन त्यांनी असहकार चळवळीत भाग घेतला.तेव्हा ते डीएव्ही कॉलेजचे विद्यार्थी होते. कानपूर हे ते ठिकाण होते जिथे शचींद्रनाथ संन्याल, सुरेशचंद्र भट्टाचार्य, योगेशचंद्र चटर्जी आणि इतरांनी हिंदुस्थान रिपब्लीकन असोशिएशन  ची स्थापना केली. बिजॉयकुमार सिन्हा, शिव वर्मा, जयदेव कपूर आणि सुरेंद्रनाथ पांडे आणि इतर लोक जे प्रभात पक्षाचे सदस्य होते त्यांनी हिंदुस्थान रिपब्लीकन पक्षामध्ये आपले कार्य चालू केले. शिव वर्मा हे समाजवादाकडे झुकले होते. बिजॉयकुमार सिन्हा यांनी शिव वर्मा यांची ओळख पत्रकार आणि लेखक राधा मोहन गोकुळ यांच्याशी करून दिली. जे शिव वर्मा यांचे वैचारिक मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान बनले. १९२५ मध्ये काकोरी रेल्वे दरोडा घटनेनंतर चंद्रशेखर आझाद झाशी येथे एकांतवासात राहत होते. याचवेळी शिव वर्मा यांची त्यांच्याशी भेट झाली. कानपूर येथील डीएव्ही कॉलेजमध्ये शिकत असताना शिव वर्मा १९२७ मध्ये भगतसिंग यांना पहिल्यांदा भेटले. १९ डिसेंबर १९२७ रोजी पं. राम प्रसाद बिस्मिल यांना फाशी देण्यापूर्वी त्यांच्या आईच्या मदतीने शेवटच्या दिवशी शिव वर्मा संघटनेच्या वतीने त्यांना भेटले. आणि त्यांच्याकडून गुप्त माहितीआधारे दिलेल्या दोन पत्यातील एका वकीलाच्या घरी जाऊन ते शस्त्रसाठा देण्याची टाळाटाळ करीत असताना संघटनेचे भय दाखवून चार रिव्हॉल्व्हर्स तसेच काडतूस असलेले गठड संघटनेसाठी मिळविले.

काकोरीच्या प्रकरणानंतर क्रांतीकारक पक्षाच्या उर्वरित जुन्या पुढाऱ्यांच्या अंतःकरणात निराशा व कंपनाची लाट उसळली. आपले वजन टिकविण्यासाठी ते आपल्या तरुण अनुयायांसमोर गुढवादी परिभाषा वापरीत, पण प्रत्यक्षात काही करीत नसत. त्यांच्या या अकर्मण्यतेचा वीट येऊन सरदार भगतसिंह, सुखदेव, शिव वर्मा इत्यादि तरूण क्रांतीकारक नेत्यांनी स्वतंत्रपणे उत्तर भारत व बंगाल



प्रांतातील क्रांतीकारक समित्यांची भेट घेऊन सर्वांचीच एक संयुक्त सभा ८ व ९ सप्टेंबर १९२८ रोजी दिल्लीला फिरोजशहा किल्ल्या च्या एकांतपूर्ण अवशेषाच्या विभागात घेतली. या बैठकीला पंजाबमधून सरदार भगतसिंग व सुखदेव, राजस्थानमधून कुंदनलाल, संयुक्त प्रांतातून शिव वर्मा, ब्रम्हदत मिश्र, जयदेव, विजयकुमार सिंह, सुरेंद्रनाथ पांडे आणि बिहारमधून मणींद्रनाथ घोष आणि मनमोहन बॅनर्जी हे प्रतिनिधी उपस्थित होते. चंद्रशेखर आझाद यांच्या संमतीने ''हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना () या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान न भूतो न भविष्यती असे आहे. भगतसिंग यांनी या संघटनेबद्दल असे म्हटले आहे कि,.... ''दहशतवाद हा एक टप्पा आहे. क्रांतीकार्यात हे एक आवश्यक व अपरिहार्य असे पाऊल आहे. दहशतवाद म्हणजे पूर्ण क्रांती नव्हे, पण दहशतवादाशिवाय क्रांती पूर्ण होत नाही.दहशतवादामुळे राज्यकर्त्यांच्या मनमानीला धक्का बसतो. देशाच्या स्वातंत्र्यतृष्णेचा दहशतवाद हा परिणामकारक पुरावा आहे. पूर्वीच्या काळातील इतर देशांप्रमाणेच भारततही दहशतवादाचे क्रांतीत व या क्रांतीचे सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्यात रूपांतर होईल.''  या संघटनेचे प्रमुख असलेल्या शिव वर्मा यांनी चाँद या वृत्तपत्रांसाठी अनेक लेख लिहून युवकांना या संघटनेत सामील करून घेतले. सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली भारतात आलेल्या कमिटीच्या निषेधार्थ भारतात ठिकठिकाणी हरताळ पाळण्यात आला आणि सायमन गो बॅक' यासाठी आंदोलने करण्यात आली. लाहोर येथे निघालेल्या मिरवणुकीचे नेतृत्व करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर ब्रिटीश पोलीस सुपरिटेंडन्ट स्कॉट व सॉन्डर्स यांनी त्यांना मारहाण केली.तसेच लालाजींच्या छातीवर संगिनीचा वार केला. या मारामुळे थोड्याच दिवसांनी लालाजींचे निधन झाले.परिणामी लालाजींच्या अघोरी मृत्यूचा बदला घेण्यासाठी १७ डिसेंबर १९२८ म्हणजे लालाजींच्या पहिल्या मासिक दिनी भगतसिंग व राजगुरू यांनी सॉंडर्स यांना गोळ्या मारून त्यांना ठार केले. त्यानंतर 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन असोसिएशन' च्या भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती कायदे मंडळात बॉम्ब फेकले आणि देश हादरला.ब्रिटिशांचे धाबे दणाणले. त्यांनी या संघटनेच्या नेत्यांची धरपकड सुरू केली.गया प्रसाद, जयदेव कपूर आणि शिव वर्मा यांनी सहानपूरमध्ये बॉम्ब कारखाना उभारण्याचे काम चालू केले होते. १३ मे १९२९ रोजी शिव वर्मा




शिरीष चिटणीस
कार्यवाह महाराष्ट्र साहित्य परिषद


गाढ झोपेत होते तेंव्हा दार वाजले. फणींद्रनाथ घोष या व्यक्तीने पूर्वी क्रांतीकार्य केलेल्या परंतु लग्नानंतर त्याला पकडल्यानंतर माफीचा साक्षीदार झाल्यामुळे त्यांनी दिलेल्या माहितीमुळे पोलीस बॉम्ब फॅक्टरीपर्यंत पोहोचले. शिव वर्मा यांना कानपुरहून डॉ. गया प्रसादच पैसे घेऊन आले असे वाटल्याने,पिस्तुल तसेच खाटेवरील उशीखाली ठेऊन असावध स्थितीत त्यांनी दार उघडले. पाहतात तर पोलीस. शिव वर्मा आणि जयदेव कपूर यांना अटक करण्यात आली. तसेच पुढे तीन दिवसानी गया प्रसाद यांना काहीही माहिती नसल्याने ते  सहानपूरमध्ये घरी आल्यावर त्यांनाही अटक करण्यात आली. त्यांना मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले.


शिव वर्मा, जयदेव कपूर,किशोरी लाल आणि इतर सर्व हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेनेच्या क्रांतीकारकांनी १३ जुलै १९२९ रोजी भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांच्याशी एकता व्यक्त करण्यासाठी त्यांच्याबरोबर उपोषण सुरू केले.या काळात भगतसिंग, शिवराम राजगुरु, सुखदेव थापर आणि इतर बळकट पुरुषांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागला. १३ सप्टेंबर १९२९ रोजी जतींद्रनाथ दास यांनी ६३ दिवसाच्या उपोषणानंतर त्यांचे बंधू किरणचंद्र यांच्या मांडीवर प्राण सोडला. या सर्व घटनांमध्ये शिव वर्मा आघाडीवर होते. जतींद्रनाथ यांच्या मृत्यूनंतर तुरुंग समितीने राजकीय कैद्यांना खास सवलती देण्याबाबत इंग्रज सरकारकडे काही शिफारसी केल्या. फेब्रुवारी १९३० मध्ये या क्रांतीकारक देशभक्तांना पुन्हा दोन आठवडे उपोषण करावे लागले. या शिफारशीमुळे कैद्यांची नवीन वर्गवारी करण्यात आली.

अंदमान तुरूंगातही शिव वर्मा यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबून सर्वांना न्याय मिळवून दिला. स्वातंत्र्यलढ्यातील शिव वर्मा यांचे योगदान स्वातंत्र्यलढ्यातील सर्वांनाच प्रेरणादायी ठरले. शिव वर्मा यांनी सर्वांसाठी माहिती पूर्ण केलेले काम स्वातंत्र्यलढ्यातील युद्धांना ऐतिहासिक नोंदीसाठी उपयोगी पडले.

## कवितेच्या लाटावर...


कवितेच्या लाटावर...
कवितेच्या लाटावर...
कवितेच्या लाटावर...































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559